नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०९/२०२६ ( रविवार )

---

## १२ तासाच्या आत घरफोडीचा गुन्हा उघड, आरोपीस अटक
## जलालखेडा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन जलालखेडा :– **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. पराग पोटे उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री. विनोद जांभळे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्या नेतृत्वात जलालखेडा पोलिसांनी १२ तासाच्या आत घरफोडीचा गुन्हा उघड करून एका आरोपीला अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत फिर्यादी नामे श्री. लक्ष्मीकांत शेषराव पावडे, वय ४९ वर्षे, रा. भारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर यांनी पोस्टे जलालखेडा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. १७/०९/२०२६ ते दि. १८/०९/२०२६ रोजीचे रात्री दरम्याण कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून घरातील एक काळा रंगाचा ३२ इंच टी.व्ही., किंमती १२,९९९/– रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेले आहे. असे फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

जलालखेडा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील संशयित आरोपी कलाम युसूफ शेख, वय ४२ वर्षे, रा. वॉर्ड क्र. ०३, भारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर याने सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. आरोपीस मौजा भारसिंगी येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने जलालखेडा परिसरात गुन्हा केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून एक काळा रंगाचा ३२ इंच टी.व्ही किंमती १२,९९९/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयातील **आरोपी कलाम युसूफ शेख, वय ४२ वर्षे, रा. वॉर्ड क्र. ०३, भारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर याला अटक करण्यात आले.**

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपींना अटक
## ०३ गोवंश जनावरांची सुटका, पारशिवनी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवनी :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पारशिवनी यांच्या नेतृत्वात पारशिवनी पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण ०६ लाख ३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींना अटक केले आहे.**

दिनांक १९/०९/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा करंभाड शिवार सावनेर ते पारशिवनी रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप वाहन क्र एम एच—४०/सी टी—३३६५ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **१)** रोशन नरेश बक्सरे, वय २२ वर्ष, रा. खरडूका पोस्ट— बडेगाव ता. सावनेर, जि. नागपूर २) अंकीत बाळूजी डेहनकर, वय २५ वर्ष, रा. खरडूका पोस्ट— बडेगाव ता. सावनेर, जि. नागपूर हे मिळुन आले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०३ गोवंश (बैल) जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान ३) सोनू ओंकार बावनकर, वय ३३ वर्ष, रा. बाबूळवाडा ता. पारशिवनी ४) निखील कुमरे, रा. कोच्छी पोस्ट—बडेगाव ता. सावनेर ५) प्रदीप मोहटे, रा. खापा ता. सावनेर यांना निष्पन्न केले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र एम एच—४०/सी टी—३३६५ किंमती ५,००,०००/— रूपये आणि ०३ गोवंश (बैल) जनावरे किंमती ७०,०००/— रूपये, ०२ अँडरॉईड मोबाईल असा एकुण किंमती ६,०३,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी ही पाचही आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ११(१), (क), (ह), (ब) (१) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (ब), (१), ९ महा. पशु सरक्षण अधि १९७६, सहकलम ४९, ३(५) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

# अवैधरित्या व क्षमतेपेक्षा अधिक रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०१ आरोपी अटक
# २५ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त
# नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :– दिनांक १९/०९/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मोवाड ते गणेशपुर रोडवर येथे नाकाबंदी केली असता संशयित १० चक्का टिप्पर गाडी क्र एम एच–२९/बी इ– ०९६६ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक नामे नरेंद्र सहदेव देव्हारे, वय ३६ वर्षे, रा. पूसला, ता. वरूड, जि. अमरावती अशी माहिती प्राप्त झाली. त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे परवाना नव्हता. मालकाबाबत विचारपुस केली असता पलास राऊत, रा. ता. वरूड, जि. अमरावती अशी माहिती प्राप्त झाली. टिप्पर मधील रेतीचे वजन करण्यात आले. वजन केल्यानंतर सदर वाहनामध्ये ०६ ब्रास रेती विनापरवाना असल्याचे निष्पन्न झाले.

**पोलीसांनी पंचासमक्ष १० चक्का टिप्पर गाडी क्र एम एच–२९/बी इ– ०९६६ किंमती २५,००,०००/– रूपये आणि ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/– रूपये असा एकुण किंमती २५,३०,०००/–रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी चालक व मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम ३०३(२), ४९ भा. न्या.सं २०२३, सहकलम ६६(१)/१९२ (अ), २०७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी चालकास अटक करण्यात आली आहे.**



**अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०५ गुन्हे दाखल, ३१४०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**दिनांक १९/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०५ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे सुखदेव गवतु बागडे, वय ७६ वर्ष, रा. मंगसा याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) अविनाश गोंविदा मसराम, वय ४३ वर्ष, रा. अभ्यंकर चौक, ता. उमरेड २) गोंविदा बापुराव लोंखडे, वय ६० वर्ष, रा. लिना ले आउट, ता. उमरेड यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन कुही** अंतर्गत आरोपी नामे तुलाराम तुळसीराम चाचरकर, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र ०२, कुही, ता. कुही याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** नितीन बबन मोरेशिया रा.विनोबा भावे वार्ड रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १४४० मिली देशी दारू, २५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ३१४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर